# PROJECT OF VJM FOR WATER AWARNESS, CONSERVATION AND PLANTATION

## Rain water harvesting on Hanuman Hill, Arvi road, Wardha

**Hanuman Hill In 2015**



**CCT 8x2x2 digging  work in progess**

**About 250 CCT done with active people of wardha through VJM**







# CCT completed waiting for rain



**Team VJM**



**Most awaited moment….rain came and each drop saved and collected to percolate in hill soil**



**Big Trenches**



## About 2 crore of rain water collected in treches , cct and Percolated on Hill



## Plantation compaign on hanuman hill around 14000 plants are there



# CCT with plantation



**Wash Out Water From MJP (Maharashtra Jivan Pradhikaran) , About 3 lacs Ltrs per day which was going in Drian and wasted diverted to Hanuman Hill and circulated through 2.5 kms deep CCT**



# Hanuman Hill Before (2015)



# Hanuman hill   (2016)



## Hanuman Hill 2018



## Team VJM in action





# PAPER NEWS



टेकडीवर ठिकठिकाणी खंदक खोदण्यात आले असून इतर ठिकाणी खड्डे खोदून झाडेही लावण्यात आली आहे.

## वैद्यकीय जनजागृती मंचचा उपक्रम : डॉक्टरांच्या श्रमदानातून उपक्रमाला मूर्त रुप

# पुनर्भरणाला जोरदार पावसाची प्रतीक्षा

**वर्धा :** राज्यात उद्भवलेली पाण्याची भीषण टंचाई लक्षात घेता सर्वत्र पुनर्भरण यंत्रणेवर भर देण्याच्या बाबी समोर येऊ लागल्या होत्या. पण कुणी पुढाकार घेताना दिसत नव्हते. वर्धेत मात्र आपला वैद्यकीय व्यवसाय हा समाजहिताकरिता काही काळ बाजूला सारुन डॉक्टरांनी पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण करण्याचा निर्णय घेतला. केवळ निर्णयच घेतला नाही तर लोक सहभागातून कामालाही सुरुवात केली. हे काम आता पूर्णत्वास आले असून पुनर्भरणाकरिता आता जोरदार पावसाची प्रतीक्षा आहे.

वैद्यकीय जनजागृती मंचने हनुमान टेकडी, पिपरी मेघे येथे पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण करण्याची संकल्पना राबवली. टेकडीच्या सभोवताल खंदक करण्यात आले आहे. प्रथम केवळ वैद्यकीय जनजागृती मंचच्या सदस्यांनी सुरु केलेल्या कार्याला लोकसहभाग लाभला. तब्बल दोन ते अडीच महिने डॉक्टर आणि नागरिकांनी हातात पावडे घेऊन खंदक तयार केले. झाडांसाठी खड्डेही यावेळी खोदण्यात आले.

खंदक खोदण्याचे काम आटोपले असून आता फेन्सिंगसाठी लोकसभागातून निधी उभारला जाणार आहे. पावसाचे आगमन होताच वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. वैद्यकीय जनजागृती मंचच्या पुढाकाराने वर्धेत एका टेकडीवर जल पुनर्भरणाचा प्रयोग राबविण्यात आला. पाणीटंचाई निवारणार्थ लोकसहभागातून असेच प्रयोग जिल्ह्यात अन्यत्र राबविले जाणेही गरजेचे आहे.(कार्यालय प्रतिनिधी)

### जल पुनर्भरणाचे वैयक्तिक प्रकल्पही गरजेचे

- वैद्यकीय जनजागृती मंचने सामूहिक जल पुनर्भरणाचा प्रयोग राबविला. या मंचातील डॉक्टरांनी वैयक्तिक जल पुनर्भरणाचे संयंत्रही नागरिकांना उपलब्ध करून दिले आहेत. शिवाय अनेक डक्टरांनी ते आपापल्या घरी बसविले आहेत. यासाठी अधिक खर्च येत नसल्याने नागरिकांनी सदर संयंत्र आपापल्या घरी लावावे, असे आवाहन केले जात आहे. जल पुनर्भरणाची गरज ओळखून नागरिकांनी वैयक्तिक प्रकल्प राबविले तर जिल्ह्यात कधीही पाणी टंचाई जाणवणार नाही. यासाठी सर्व नागरिकांनी पुढाकार घेत पुनर्भरण करणे गरजेचे आहे. यासाठी लागणारे संयंत्र डॉ. सचिन पावडे यांच्यासह व्हीजेएमच्या सदस्यांकडे उपलब्ध आहे.

जलमित्र अभियान

जल पुनर्भरण उपक्रमात सहभागी झालेले वैद्यकीय जनजागृती मंचचे सदस्य.

ठिकठिकाणी पाणी अडविण्यासाठी मातीचे थर देण्यात आले आहे.

### वृक्ष लागवडीचाही प्रयोग

- सध्या हनुमान टेकडीच्या सभोवताल खंदक खोदण्यात आले आहेत. या खंदकातून निघणाऱ्या मातीमध्ये खड्डा तयार करुन वृक्षारोपण करण्यात येणार आहे. त्यामुळे टेकडीवरील माती वाहून जाणार नाही. झाडांमुळे माती धरुन राहणार असून टेकडी हिरवीगार होण्यासही मदत होणार आहे. वृक्ष लागवडीसह संगोपन, संवर्धन या बाबीकडेही लक्ष देण्यात येणार आहे. नागरिकांचा सहभाग असल्याने ही कामे सोपी होणार असल्याचे मत मंचच्या सदस्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकल्पापासून अन्य संस्था, संघटनांनीही बोध घेत जल पुनर्भरण प्रकल्प हाती घेणे गरजेचे झाले आहे.

# Water Cup Mahashramdan - 2016



## Awareness, Motivation & Education – Dr. Sachin Pawade 2017





## Awareness, Motivation & Education – Dr. Sachin Pawade 2017






**Consistent efforts resulted in drastic rise in awareness in General population leading to mass movement towards rain water harvesting & ground water recharge on community and personal level.**

**Awareness lecture series regarding Judicious use of water and Rain Water Harvesting Techniques all over Vidarbha.**














जल जीवन फाऊंडेशन अमरावती
जल जागृती अभियान
श्री. शैलेश नवाल
श्री. संजय निपाणे
डॉ.श्री. सचिन पावडे


कार्यक्रमाचे अध्यक्ष
श्री. शैलेश नवाल
जिल्हाधिकारी, अमरावती
कार्यक्रमाचे उद्घाटन
श्री. संजय निपाणे
आयुक्त, मनपा, अमरावती
डॉ.श्री. सचिन पावडे
डॉ. नीरज मुरके
सचिव, IMA




INDIAN MEDICAL ASSOCIATION, NAGPUR
DR. DINKAR HARDAS CME HALL
Raigarh






जल जन जागृती कार्यक्रम
कार्यक्रमाचे उद्घाटक
श्री. सोपानजी नागरगोजे
प्रमुख मार्गदर्शक
डॉ. सचिन पायडे
प्रमुख अतिथीः
वेळः सायंकाळी ४.०० वाजता


SHOT ON REDMI NOTE5 PRO
MI DUAL CAMERA
2019/6/13 21:37

## Chief Minister of Maharashtra

## Hon. Mr. Devendraji Fadanvis appreciated the efforts taken by VJM




**Final result water cup 2017 – Kakaddhara village Dist. Wardha stood first in Maharashtra**

**Dr. Sachin Pawade President VJM with Water Cup 2017**






**Water bank – new concept 2019 -- Rs 4.5 lacs Generated from Donations distributed to 18 Villages for Machine work for water conservation**

लोकमत

# 'वॉटर बँक' देणार गावांना पाणीदार व्याज

## व्हीजेएमची नवी संकल्पना : ३० रुपयाच्या गुंतवणुकीतून मिळणार ५० हजार लिटर पाणी

आनंद इंगोले।
लोकमत न्यूज नेटवर्क

**वर्धा :** सध्याच्या दुष्काळी परिस्थितीमुळे पैशांपेक्षाही पाण्याला जास्त महत्त्व आले आहे. म्हणूनच भविष्यातील धोका ओळखून वैद्यकीय जनजागृती मंचाने (व्हीजेएम) वॉटरकप स्पर्धेत सहभागी झालेल्या गावांना पाणीदार करण्याकरिता 'वॉटर बँक' ही संकल्पना साकारली. या बँकेच्या माध्यमातून केवळ ३० रुपयांची गुंतवणूक केल्यास गावकऱ्यांना ५० हजार लिटर पाणी व्याजाच्या रुपात मिळणार आहे. त्यामुळे नागरिकांनी 'वॉटर बँक' मध्ये गुंतवणूक करण्याची गरज आहे.

स्थानिक वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असलेल्या डॉक्टरांसह कर्मचाऱ्यांनी पर्यावरणाचे बिघडलेले आरोग्य सुधारण्यासाठी वैद्यकीय जनजागृती मंच (व्हिजेएम) च्या माध्यमातून कार्य सुरु केले आहे. त्यांच्या कार्याला वर्धेकरांचाही हातभार लागत आहे. जिल्ह्यातील जलसंकट गडद होत असल्याने भविष्यात पाण्याची बचत व्हावी, जमिनीत मोठ्या प्रमाणात पाणी साठविले जावे, याकरिता जलपुनर्भरण तसेच मॅजिक पीटचा वापरावर भर दिला जात आहे. पाणी टंचाईच्या झळा असह्य झाल्याने अनेकांनी जलपुनर्भरण आणि शोष खड्डा तयार करायला सुरुवात केली आहे.पाणी फाऊंडेशनच्या वॉटरकप स्पर्धेत सहभागी २४२ गावांना जलयुक्त करण्याकरिता 'वॉटर बँक' सुरु केली असून लोकसहभागातून गुतवणूक वाढविण्याकरिता प्रयत्न चालविले आहे. यातील गुंतवणूक वाढली तर आपले आणि भविष्यातील पिढीचे जीवन पाणीदार होणार असल्याचा विश्वास वैद्यकीय जनजागृती मंचाने व्यक्त केला आहे.



वॉटरकप स्पर्धेसाठी गावकऱ्यांना मार्गदर्शन करताना व्हीजेएमचे पदाधिकारी.

### लोकसहभागातून यंत्रसामुग्री उभी करण्यासाठी धडपड

जिल्ह्यातील सेलू, देवळी, कारंजा व आर्वी तालुक्यातील २४२ गावांचा पाणी फाउंडेशन वॉटर कप स्पर्धेत सहभाग असून ८ एप्रिलपासून श्रमदानाला सुरुवात झाली आहे. प्रत्येक गावांमध्ये पोकलॅन मशीनची आवश्यकता असल्याने एका तासासाठी २ हजार २०० रुपये मोजावे लागतात. त्यानुसार प्रत्येक गावाला मशिनीकरिता ३ लाख रुपये खर्च असल्याने सामाजिक बांधिलकी जोपासत एक दिवस श्रमदान करुन मशिनीकरिता १ रुपयापासून पुढे कित्तीही रुपये अर्थसहाय्य करण्याचे आवाहनही वैद्यकीय जनजागृतीमंचाने केले आहे.

### अशी करा गुंतवणूक आणि मिळवा भरपूर व्याज

साधारणत: मशीनद्वारे १ घनमीटर खोदकाम करण्यासाठी ३० रुपये खर्च पडतो. १ घनमीटर म्हणजेच ३५.२८ घनफूट होतात. १ घनफुटामध्ये आपण अंदाजे ३० लिटर पाणी जमा करु शकतो. यानुसार १ घनमीटर मध्ये १ हजार लिटर पाणी आपण जमा करु शकतो. एका पावसाळ्यात खोदलेला १ घनमीटर खड्डा ५ वेळा जमिनीत पाणी मुरवितो. त्यामुळे १ घनमीटर खड्ड्यात ५ हजार लिटर पाणी मुरवू शकतो. खोदलेला खड्डा हा कमीत कमी १० वर्षे आपल्याला पाणी मुरविण्याकरिता उपयोगी पडतो. म्हणजेच आपल्या ३० रुपयांच्या गुंतवणुकीमध्ये आपण ५० हजार लिटर पाणी जमिनीत मुरवू शकतो. यातून भविष्यात भरपूर पाणी उपलब्ध होऊ शकते.

> गावांना मशीन व डिझेलचा पुरवठा करण्याकरिता लोकसहभागातून आर्थिक मदतीचे आवाहन केले आहे. ती रक्कम 'वॉटर बॅंक' मध्ये जमा करुन उत्कृष्ट काम करणाऱ्या गावांमध्ये ती गुंतविली जाईल. त्यामुळे गावातील पाणी पातळी वाढण्यास मदत होईल.
>
> \- डॉ. सचिन पावडे, अध्यक्ष, वैद्यकीय जनजागृती मंच.

Nagpur Main
Page No. 5 May 07, 2019
Powered by: erelego.com

**Project Miyawaki – VJM Jalad Ghanwan 5500 Plantation till date**







**4 months old Pulwama Shahid Miyawaki forest At Hanuman Hill, In the memory of our Great Soldiers lost their lives at Pulwama Attack.**



**Open spaces development for ground water recharge through Big Soak pits towards the slop of open spaces in urban colonies.**





**Bhoojal Moist Soil A direct recharge filter for Well and Borwell Invented by Dr. Sachin Pawade President VJM till date about 850 installations on NO LOSS NO PROFIT all over Maharashtra.**

**Got appreciation by community as they got tremendous result from the recharge of first rain only.**




तुम्हाला माहित आहे का?
तुम्ही आता ज्या आरोग्य केंद्रात आहात ते सुद्धा
लसीकरणासाठी तुम्ही निवडलेले केंद्र
आरोग्य केंद्रच आहे.
सर्वात उत्तम सुरक्षा
प्रतिबंध हाच एकमेव उपाय
अभय
आरोग्य केंद्र
जीवन अमूल्य आहे... आयुष्याशी खेळू


Shot on M7 Power

**<u>Bhoojal Moist soil recommended by Government of Maharashtra for Direct recharge in well and borwell</u>**



**<u>मुख्यमंत्री सचिवालय</u>**

**विषय : <u>छतावरील पावसाचे वाया जाणारे पाणी साठवण्याचे तंत्रज्ञान.</u>**

डॉ. सचिन पवाडे, अध्यक्ष, वैद्यकीय जनजागृती मंच, वर्धा यांच्याकडून डिसेंबर, २०१६ च्या नागपूर हिवाळी अधिवेशनात विषयांकित तंत्रज्ञानाबाबत सादरीकरण करण्यात आले होते. या तंत्रज्ञानाबाबतची आवश्यक ती तपासणी करुन अहवाल सादर करण्याबाबत संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे यांना कळविण्यात आले होते.

भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेने डॉ.पवाडे यांनी छतावरील पावसाचे वाया जाणारे पाणी साठवण्याबाबतची जी यंत्रणा विकसित केली आहे त्याची तपासणी करुन आपला अहवाल सादर केला आहे. त्याची प्रत आपल्या माहितीसाठी यासोबत पाठविण्यात येत आहे.

पावसाळ्यात घरांच्या छतावर पडणारे पाणी वाया जाऊ न देता ते साठवून पिण्याकरीता वापरण्यासाठी उपयोगात येणारी ही किफायतशीर यंत्रणा आहे. ही यंत्रणा उपयोगात आणल्यास मुख्यत: दुष्काळग्रस्त भागात जलसंवर्धनाद्वारे किमान पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य कमी करता येईल.

आपणांस विनंती की, आपण याबाबत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी व ग्रामीण) अंतर्गत राज्यातील विविध शहरे/गावांमध्ये बांधण्यात येणाऱ्या घरकुल योजनांमध्ये या यंत्रणेचा वापर करता येईल का, याबाबत आवश्यक ती तपासणी करावी. तसेच या यंत्रणेचा वापर ज्या घरकुल धारकाकडून केला जाईल त्यास ग्रामपंचायत/नगरपंचायत/नगरपालिका/महानगरपालिका क्षेत्रामध्ये घरपट्टी/मालमत्ता करात सवलत देता येईल का, याचाही विचार करावा.

प्रवीण

**(प्रवीण परदेशी)**
**मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव**

**प्रधान सचिव (नगरविकास-१)**

**प्रधान सचिव (ग्रामविकास)**

अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण)

**<u>Domestic Water Recharge by Nanded Pattern Soak pits initiative by VJM to increase the ground water level throughout the year about 500 such pits made in Wardha and nearby in last month.</u>**







लोकमत

# होऊनी जलयोद्धा, करुया शोषखड्डा!

## वैद्यकीय जनजागृती मंचचे आवाहन : पत्रपरिषदेत पाणी बचतीचा सांगितला मार्ग

लोकमत न्यूज नेटवर्क

**वर्धा** : अल्प पर्जन्यमान व पाण्याचा अमर्याद उपसा, यामुळे दिवसेंदिवस पाणीपातळी खालावत आहे. परिणामी पाणी आपली जिरवायला लागल्याने आता जमिनीत पाणी जिरविण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. त्याकरिता घरोघरी शोषखड्डा तयार करण्यासोबतच जल पुनर्भरणाची चळवळ उभी करण्याचे आवाहन वैद्यकीय जनजागृती मंचाचे अध्यक्ष डॉ. सचिन पावडे यांनी पत्रकार परिषदेतून केले.

### विहीर, बोअरवेलची पातळी वाढविणार 'मॅजिक पिट'

◆ ग्रामीण भागात श्रमदानाचे तुफान आल्याने घरोघरी शोषखड्डे करणे बंधनकारक करण्यात आले आहे. शहरात मात्र याकडे दुर्लक्ष होत आहे. शहरातील प्रतिमाणसी दीडशे लिटर पाण्याची आवश्यकता असते. घरात चार सदस्य असल्यास एका दिवसाला सहाशे लिटर पाणी लागते. त्यापैकी केवळ शभर लिटर पाणी पिण्यासाठी व स्वयंपाकासाठी वापरले जात असून उर्वरित पाचशे लिटर पाणी हे सांडपाणी म्हणून नालीत वाहत जाते. याच पाण्याला शोषखड्ड्यांव्दारे जमिनीत मुरविल्यास पाणी पातळीतील 'मॅजिक' अनुभवायला येईल. एक दोघांनी नाही तर दररोज हजारो नागरिकांचे सहकार्य मिळाले तर ५०० ते ६00 मि.मी. पाऊस आला तरीही दुष्काळ जाणवणार नाही, असा विश्वासही डॉ. सचिन पावडे यांनी व्यक्त केला.

जिल्ह्यात जलसंकट गडद होत असतानाही नागरिकांकडून पाण्याचे योग्य नियोजन केले जात नाही. मोठ्या प्रमाणात पाण्याचा उपसा, अपव्ययही होत आहे. पाण्याच्या बचतीकरिता आणि पाणी मुरविण्याकरिता दुर्लक्ष होत असल्याने हल्ली चारशे फुटांपर्यंत बोअरवेल केली तरीही पाणी मिळ्त नाही, अशी अवस्था निर्माण झाली आहे. याकडे असेच दुर्लक्ष राहिले तर भविष्यातील पिढीला पाणी मिळणे कठीण होणार आहे. अजूनही परिस्थिती हातात असल्याने प्रत्येकाने वर्षभर पाणी मुरविण्याकरिता घरोघरी शोषखड्डे तयार करावे, तसेच पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब जमिनीत मुरविण्याकरिता जलपुनर्भरण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, याकरिता वैद्यकीय जनजागृती मंच सदैव सहकार्य करण्यासाठी तयार असल्याचेही सांगितले. या पत्रकार परिषदेला डॉ. सचिन पावडे, डॉ. आनंद गाढवकर, सचिन गरपाल, मोहन मिसाळ, श्याम भेंडे, मंगेश दिवटे, महेश अडसुळे, अजय वरटकर, अनिल मुखरे, रोशन देशमुख व अनंत बोबडे यांची उपस्थिती होती.